# पू. अनंत आठवले यांचे चरित्र : खंड १
# पू. अनंत आठवले यांची गुणवैशिष्ट्ये

## विषयसूची


१. पू. अनंत बाळाजी आठवले यांचा परिचय ६

२. पू. अनंत आठवले म्हणजे, ईश्वराने सनातन संस्थेला दिलेले अनमोल गुणरत्न ! ९

३. एकमेकांविषयी भाव, प्रीती आणि कृतज्ञता असलेले पू. भाऊ आणि परात्पर गुरु डॉ. जयंत आठवले ! १३

४. प्रस्तुत ग्रंथाचे संकलक, परात्पर गुरु डॉ. जयंत आठवले यांचे अद्वितीय कार्य आणि वैशिष्ट्ये यांचा संक्षिप्त परिचय ! १४

५. ग्रंथातील काही संबोधने, उपाधी आणि संज्ञा यांविषयीची स्पष्टीकरणे १६


## ग्रंथाची अनुक्रमणिका

(काही प्रकरणांतील वैशिष्ट्यपूर्ण मथळे पुढे दिले आहेत.)


**प्रकरण १. पू. अनंत आठवले यांची त्यांच्या कुटुंबियांनी सांगितलेली वैशिष्ट्ये** १७

१ अ. पू. अनंत आठवले (पू. भाऊकाका) यांच्या बंधूंनी सांगितलेली वैशिष्ट्ये १७

१ आ. पू. भाऊकाका यांच्या पत्नी सौ. सुनीती यांनी उखाण्यातून सांगितलेले वैशिष्ट्य २०

**प्रकरण २. पू. अनंत आठवले यांच्याविषयी सद्गुरूंनी काढलेले भावस्पर्शी उद्गार !** २१

२ अ. श्रीसत्‌शक्ति (सौ.) बिंदा नीलेश सिंगबाळ, सनातन आश्रम, रामनाथी, गोवा. २१

२ आ. श्रीचित्‌शक्ति (सौ.) अंजली मुकुल गाडगीळ, सनातन आश्रम, रामनाथी, गोवा. २२

**प्रकरण ३.** **पू. अनंत आठवले यांची पू. (सौ.) संगीता विष्णु जाधव यांनी सांगितलेली गुणवैशिष्ट्ये** २३

**प्रकरण ४.** **पू. अनंत आठवले यांची सनातनच्या साधकांनी सांगितलेली गुणवैशिष्ट्ये** २५

४ अ. पू. अनंत आठवले यांनी ६४ टक्के आध्यात्मिक पातळी गाठल्यावर, तसेच इतर प्रसंगी साधकांनी सांगितलेली गुणवैशिष्ट्ये २५

४ आ. पू. अनंत आठवले यांनी संतपद गाठल्यानंतर साधकांनी सांगितलेली गुणवैशिष्ट्ये ७०

४ आ १. पू. अनंत आठवले यांच्या वाढदिवसांच्या प्रसंगी सांगितलेली गुणवैशिष्ट्ये ७०

४ आ २. अन्य प्रसंगी सांगितलेली गुणवैशिष्ट्ये ७२

**प्रकरण ५.** **पू. अनंत आठवले यांच्या पत्नी सौ. सुनीती यांची गुणवैशिष्ट्ये** ७३

**प्रकरण ६.** **पू. अनंत आणि सौ. सुनीती आठवले यांची सामायिक गुणवैशिष्ट्ये** ७५

**प्रकरण ७.** **पू. अनंत आठवले आणि सद्गुरु (कै.) डॉ. वसंत आठवले यांच्या वैशिष्ट्यांतील साम्य** ७६

**प्रकरण ८.** **पू. अनंत आठवले यांच्या छायाचित्रातून पुष्कळ चैतन्य प्रक्षेपित होत असल्याचे दर्शवणारी वैज्ञानिक चाचणी** ८०

**प्रकरण ९.** **पू. अनंत आठवले यांच्या जन्मकुंडलीतील वैशिष्ट्यपूर्ण ग्रहयोग** ८२

---

**टीप :** ग्रंथातील काही सूत्रांच्या शेवटी मराठी किंवा इंग्रजी अक्षरांत संकेतांक वा सांकेतिक चिन्हे कार्यालयीन सोयीसाठी दिली आहेत. त्यांचा लिखाणाशी संबंध नाही. काही अपरिहार्य कारणामुळे काही संकेतांक इंग्रजीत ठेवले आहेत.

## विषयसूचीतील क्रमांक २

# पू. अनंत आठवले म्हणजे, ईश्वराने सनातन संस्थेला दिलेले अनमोल गुणरत्न !

‘माझ्या बालपणापासून ज्यांनी माझ्यावर सुसंस्कार केले, ते माझे दोन मोठे बंधू म्हणजे ती. सद्गुरु (कै.) अप्पा (वसंत) आणि ती. पू. भाऊ (अनंत) आठवले !

पू. भाऊंचे व्यक्तीमत्त्व हे अनेकविध सद्गुणांनी इतके अलंकृत आहे की, त्यांचे ‘चरित्र’ अनेकांना साधनेत मार्गदर्शक ठरणार आहे. ‘पू. भाऊंसारख्या वयोवृद्ध (वय ८६ वर्षे), तपोवृद्ध आणि ज्ञानवृद्ध संतांचे चरित्र मला ग्रंथरूपात संकलित करण्याची संधी मिळत आहे’, हा माझ्यासाठी अवर्णनीय आनंदच आहे. पू. भाऊंचे चरित्र आम्ही २ खंडांमध्ये प्रसिद्ध करत आहोत. प्रस्तुत प्रथम खंडात पू. भाऊंच्या गुणवैशिष्ट्यांचा वेध घ्यायचा मी प्रयत्न केला आहे.

## समर्थ रामदासस्वामी आणि श्रीकृष्ण यांना ‘गुरु’ मानून साधना करून संत होणारे पू. भाऊ !

कोणत्याही साधनामार्गाने साधना करतांना देहधारी गुरूंची नितांत आवश्यकता असते. याचे कारण म्हणजे, गुरूंनी साधनेविषयी टप्प्याटप्प्याला केलेले प्रत्यक्ष मार्गदर्शन आणि गुरूंच्या सेवेमुळे त्यांची होणारी कृपा यांमुळे साधक किंवा शिष्य अध्यात्मात लवकर उन्नती करू शकतो. याउलट देहत्याग केलेल्या संतांना किंवा साक्षात् भगवंतालाच ‘गुरु’ मानून साधना करून अध्यात्मात उन्नती करणे, हे ‘देहधारी गुरु असण्याच्या’ तुलनेत कठीण असते. याचे कारण म्हणजे, देहत्याग केलेल्या संतांच्या किंवा

भगवंताच्या उपलब्ध मार्गदर्शनातील मर्म समजून घेऊन स्वतःच्या स्तरावर पुढच्या पुढच्या टप्प्याची साधना करत रहाणे तेवढे सोपे नसते, तसेच त्यांची कृपा संपादन करायला स्वतःच्या साधनेचे बळही मोठे असावे लागते. पू. भाऊंनी लहानपणापासून 'समर्थ रामदासस्वामी' आणि 'भगवान श्रीकृष्ण' यांनाच 'गुरु' मानले आहे अन् त्यांनी केलेले मार्गदर्शन सांसारिक जीवन जगत असतांनाही आचरणात आणून संतपद गाठले आहे. यावरून पू. भाऊंच्या जीवनाला असलेली अध्यात्माची भक्कम बैठक आणि त्यांच्या साधनेची उंची लक्षात येते.

## पू. भाऊ मूलतः ज्ञानयोगी असूनही कर्मयोगी आणि भक्तीयोगीही आहेत !

लहानपणापासूनच पू. भाऊ ज्ञानयोगी वृत्तीचे आहेत. लहानपणी 'दासबोध' आणि 'गीता' यांचे अध्ययन करणे', हे त्यांचे आवडीचे छंद होते. पुढे त्यांनी अध्यात्मावरील अनेक ग्रंथांचा सखोल अभ्यास केला आणि त्यातून जे ज्ञान अर्जित केले, ते कृतीतही आणले. यामुळे त्यांची ज्ञानयोगानुसार साधना झाली.

पू. भाऊ ज्ञानयोगी असले, तरी 'कर्म न करण्यापेक्षा कर्म करणे अधिक श्रेयस्कर', या गीतेतील वचनानुसार (अध्याय ३, श्लोक ८) ते आज वयाच्या ८६ व्या वर्षीही कर्मरत आहेत. ते सनातन संस्थेच्या संकेतस्थळावरील मराठी भाषेतील लिखाणाचे हिंदी भाषेत भाषांतर करण्याची सेवा करतात. केवळ ही सेवाच नव्हे, तर जीवनातील प्रत्येकच कृती ते परिपूर्ण करतात. या योगे ते कर्मयोगी आहेत.

पू. भाऊंचा श्रीकृष्णाप्रती अपार भाव आहे. त्यांच्या सहज बोलण्यातसुद्धा श्रीकृष्णाचा वारंवार उल्लेख येतो. पू. भाऊंचे जीवनच जणू श्रीकृष्णमय झाले आहे ! सनातनच्या साधकांनाही त्यांचा श्रीकृष्णाप्रती असलेला कृतज्ञताभाव आणि शरणागतभाव त्यांच्या मुखमंडलावर, तसेच

त्यांच्या आचरणातून नेहमीच जाणवतो. या योगे पू. भाऊ भक्तीयोगीही आहेत.

साधनेत ज्ञानयोग, कर्मयोग आणि भक्तीयोग अशा तिन्हींचा सुंदर समन्वय असणे, हे अभावानेच पहायला मिळते. पू. भाऊंचे व्यक्तीमत्त्व हे अशा आगळ्या प्रकारेही सुशोभित झाले आहे.

## मूलतः व्यष्टी प्रवृत्तीचे असूनही समष्टीशी सहजतेने समरस होणारे पू. भाऊ !

सर्वसाधारणतः व्यष्टी प्रवृत्तीचे ('मी आणि माझी साधना' एवढाच विचार करणारे) साधक किंवा भक्त समष्टीशी (समाजाशी) तेवढे समरस होतांना दिसत नाहीत. पू. भाऊ लहानपणापासून व्यष्टी प्रवृत्तीचे असूनही सनातनच्या साधकांच्या संपर्कात आल्यावर त्यांचे अनेक समष्टी गुणही आमच्या लक्षात आले. साधकांशी सहजपणे आणि मनमोकळेपणाने बोलणे, प्रेमभाव, इतरांचा विचार करणे, यांसारख्या त्यांच्या अनेक गुणांविषयी साधकांनी भरभरून लिहून दिले आहे. 'पू. भाऊंनी अध्यात्मावर लिहिलेले ग्रंथ आणि नियतकालिक 'सनातन प्रभात'मधून त्यांचे वेळोवेळी प्रसिद्ध होणारे लेख', ही त्यांची समष्टीला अध्यात्मज्ञान देण्याची तळमळ दर्शवते.

'हिंदु धर्म निज रक्षण करणे धर्म एक अमुचा ।', या उक्तीनुसार पू. भाऊ धर्म आणि अध्यात्म यांविषयी अपसमज पसरवणाऱ्यांवर त्यांच्या लिखाणाद्वारे वज्राघात करण्यासही कचरत नाहीत !

अनेक साधक व्यष्टी प्रवृत्तीचे असतात. साधना करतांना व्यष्टी गुणांसह समष्टी गुणही आचरणात आणले, तर अध्यात्मात लवकर प्रगती होते. पू. भाऊंचे चरित्र हे व्यष्टी आणि समष्टी गुणांचा सुरेख संगम आहे. त्यामुळे पू. भाऊंच्या चरित्राच्या अभ्यासाने व्यष्टी प्रवृत्तीच्या साधकांनाही समष्टी गुण आचरणात आणण्यासाठी निश्चितच योग्य दिशा मिळेल.

## प्रसिद्धीपराङ्मुख असलेले पू. भाऊ !

१.९.२०२१ या दिवशी आम्ही पू. भाऊंना विचारले, ‘‘आपले चरित्र ग्रंथरूपाने प्रसिद्ध करायचे का ?’’ त्यावर ते म्हणाले, ‘‘यातून साधकांना लाभ होईल’, असे आपल्याला वाटत असेल, तरच करा.’’ अध्यात्मशास्त्राचे ज्ञान आणि गीतेचे बोधामृत समष्टीला देण्याची त्यांची तळमळ आणि निःस्पृहता आम्ही अनेकदा अनुभवली आहे. याउलट ‘स्वतःचे चरित्र प्रसिद्ध व्हावे’, असे त्यांना कधीच वाटले नाही !

## कृतज्ञता आणि प्रार्थना !

‘पू. भाऊंसारखे संत ‘ज्येष्ठ बंधू’ म्हणून मला लाभले आणि त्यांचे चरित्र मला ग्रंथरूपात संकलित करण्याची संधी मिळाली’, हे मी माझे भाग्यच समजतो आणि याबद्दल ईश्वरचरणी कृतज्ञता व्यक्त करतो.

‘पू. भाऊंच्या चरित्रातून प्रेरणा घेऊन सर्वच साधकांनी शीघ्र आध्यात्मिक उन्नती होण्यासाठी चांगली साधना करावी’, अशी श्री गुरुचरणी प्रार्थनाही करतो.’

**– (परात्पर गुरु) डॉ. जयंत आठवले (१५.९.२०२१)** F (SStAnA-GV + DW-SStAnA)

## सनातनच्या चैतन्यमय ग्रंथसंपदेची ठळक वैशिष्ट्ये !

- अध्यात्मातील प्रत्येक कृतीविषयी ‘का अन् कसे’ यांची शास्त्रीय उत्तरे !
- विज्ञानयुगातील वाचकांना समजेल अशा आधुनिक वैज्ञानिक भाषेतील (उदा. टक्केवारी) ज्ञान !
- तात्त्विक विवेचनच नव्हे, तर साधना कृतीत आणण्याविषयी मार्गदर्शन !
- अध्यात्मातील विविध गोष्टींच्या संदर्भात वैज्ञानिक उपकरणांद्वारे केलेले संशोधन, सूक्ष्म स्तरावरील प्रक्रिया दर्शवणारी चित्रे अन् लिखाण !